महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.५६९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७६ दि. ३०/ १०/ २०१८

**विषय :** महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित मधील कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१८ ते दि. ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत.

**संदर्भ :** १) सा.आ.क्र. ११७ (क) दि.३१.०३.१९८६.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७५ दि. २०.१०.२०१८.

........

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र. मभवा-२०१८/प्र.क्र.१८/सेवा-९ दि. १६.१०.२०१८ ला अनुसरून म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७५ दि. २०.१०.२०१८ अनुसार वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या १४२ % या दराने महागाई भत्ता दि. ०१.१०.२०१८ पासून लागू करण्यात आला असून सदर महागाई भत्ता माहे ऑक्टोबर २०१८ च्या वेतनामध्ये समाविष्ट करून देण्यात आलेला आहे. तसेच सदर प्रशासकीय परिपत्रकान्वये दि.०१.०१.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीबाबत शासन निर्णयानुसार स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्याबाबतच्याही सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

२. आता राज्य शासनाच्या वित्त विभागाने शासन निर्णय क्र. मभवा-२०१८/प्र.क्र.१८/सेवा-९ दि. २९.१०.२०१८ अन्वये राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय आहे अशा सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१८ ते दि. ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दि. ०१ जानेवारी, २०१८ ते दि. ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वाणिज्य) यांच्याशी विचार विनिमय करून मंजुरी प्रदान केली आहे.

४. परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दि. ०१ जानेवारी, २०१८ ते दि. ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांना दिवाळी पूर्वी अदा करण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

३०/१०
( संदेश हाके )
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

F:\ON D.A.Arrears-Jan.2018 - Sept 2018.doc